आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 16.03.2026 **वार- सोमवार**

एफआरपी

पुणे जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीपोटी एफआरपी देय रक्कम 4 हजार 489 कोटी 14 लाख रुपये आहे. त्यापैकी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर 3 हजार 9 शे 75 कोटी 5 लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. तर, थकीत एफआरपीचा आकडा 401 कोटी 85 लाख रुपये असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून देण्यात आली आहे. जिल्ह्यात 2025-26 च्या हंगामात 15 कारखान्यांपैकी सद्य:स्थितीत 6 कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केलेली आहे. जिल्ह्यात भीमा सहकारी साखर कारखान्याकडे 128 कोटी 99 लाख रुपयांइतकी सर्वाधिक थकीत एफआरपी आहे.

गॅस

गॅसटंचाईच्या अफवांमुळे पुण्यात नागरिक मोठ्या प्रमाणावर गॅस बुकिंग करीत असून, गॅस एजन्सीबाहेर गर्दी करीत आहेत. मात्र, प्रत्यक्षात गॅसपुरवठा मुबलक असून, फक्त भीतीने बुकिंगमुळे वितरणव्यवस्थेवर ताण येत असल्याचं शहरातील काही गॅसवितरकांनी सांगितलं. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी "शहरात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन आवाहन आमदार जगताप यांनी केलं आहे.

मनपा रुग्णालये

पुणे महापालिकेची 20 रुग्णालये आणि 47 बाह्यरुग्ण विभाग महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय महानगरपालिकेकडून घेण्यात आला आहे. भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय, डॉ. नायडू संसर्गजन्य रोग रुग्णालय, जयाबाई नानासाहेब सुतार प्रसूतिगृह, राजमाता जिजाऊ प्रसूतिगृह, डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र, औंध कुटी रुग्णालय तसेच मालती काची प्रसूतिगृह आदी रुग्णालये आणि दवाखान्यांचा यात समावेश करण्यात येणार आहे. राज्य आरोग्य विभागाच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे शहरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळेल. असे पुणे महापालिका सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी म्हटलं आहे.

टँकर

पुणे शहरात पाण्याची टंचाई जाणवू लागल्यानं टँकरच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा फेब्रुवारी महिन्यात टँकरची मागणी साडेसहा हजारांनी वाढली आहे. डिसेंबरपासून सुरु झालेल्या टँकरच्या मागणीत या महिन्याच्या अखेरीस आणखी वाढण्याची शक्यता आहे.

शनिवारवाडा

ऐतिहासिक प्रतीक असलेल्या शनिवारवाड्याला पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी मूळ स्वरूपात सात मजली उभारण्यात यावा, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी सध्या सुरु असलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात केली आहे. शनिवारवाडा ऐतिहासिक वास्तूचे १८२८ साली लागलेल्या भीषण आगीत मोठे नुकसान झाले होते. राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि जतन करण्याच्या धर्तीवर शनिवारवाड्याचे जतन करावे अशी मागणी रासने यांनी केली आहे.

झोपड्या

पुण्यातील खराडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहतीतील ९० झोपड्या 23 एप्रिल 2025 रोजी लागलेल्या भीषण आगीत जळून खाक झाल्या होत्या. तसेच यात एका रहिवाशाचे निधनही झाले होते. यातील बाधित ९० कुटुंबांना प्रत्येकी ११ हजार रुपये नुकसानभरपाई देण्यास पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे. ही रक्कम बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण पद्धतीने दिली जाणार असल्याची माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली आहे.खराडी आगीतील बाधित व्यक्तींना मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अर्थसाहाय्य मिळण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता. मृत व्यक्तीच्या वारसांना मुख्यमंत्री निधीतून मदत देण्यात आली आहे.

करसंकलन

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने १ एप्रिल 2025 ते १४ मार्च 2026 कालावधीत ८०० कोटी ८४ लाख रुपये मालमत्ता कर वसूल केला आहे. थकबाकीदारांसाठी महापालिकेने अभय योजना लागू केली असून थकीत कर एकरकमी भरल्यास विलंब दंडावर ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. तर थकबाकीदारांवर जप्ती आणि नळ जोडणी खंडित करण्याची कारवाई सुरू असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

रोजगार

पुणे जिल्हा कौशल्य विकास,रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसच यशस्वी एकेडमी फॉर स्किल्स यांच्यावतीने चिंचवड येथील 'यशस्वी भवन' इथं येत्या १८ मार्च रोजी "महिलांसाठी पंडित दीनदयाळ रोजगार मेळाव्याचे" आयोजन करण्यात आलं आहे. पुणे जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापनांनी सदर रोजगार मेळाव्यामध्ये सहभाग नोंदवला आहे.

चक्रदेव

स्त्री सक्षमीकरणाचा मार्ग स्त्रीशिक्षणाच्या माध्यमातूनच पुढे जाऊ शकतो असं प्रतिपादन एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांनी पुण्यात केलं. स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था, हिंदुस्थान आयोजित नारी शक्ती - सन्मान आणि संवाद – 2026 या कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. 'महर्षी कर्वे यांच्या द्रष्टेपणामुळेच एस.एन. डी.टी.महाविद्यालयाची स्थापना झाल्यानं स्त्रियांच्या सक्षमीकरणाला दिशा मिळू शकली', असंही त्या म्हणाल्या. याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या स्त्री शक्तीचा सन्मान करण्यात आला. यामध्ये बालकीर्तनकार अग्रणी साठे हिचा बाल सावरकर पुरस्काराने तसच प्रेरणा सहाणे-दीक्षित, गौरी गाडगीळ, रक्षा देशपांडे, सुजाता शहा यांचा गौरव करण्यात आला.

बालकवी

पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयाची विद्यार्थिनी मीरा निमगावकर हिला राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागांतर्गत आयोजित 'बाल मराठी संमेलन 2026' मध्ये होणा-या कवी संमेलनात बालकवी म्हणून निमंत्रित करण्यात आलं आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.